# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २८.०७.२०२०**

## जिल्हा : सातारा

| मागील आठवड्यातील हवामान (२२.०७.२०२० ते २८.०७.२०२०) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२९.०७.२०२० ते ०२.०७.२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | दिनांक | २९ | ३० | ३१ | ०१ | ०२ |
| ३.० | ०.० | ०.७ | १६.० | ०.० | ०.७ | - | पाऊस (मिमी) | १६ | १७ | २७ | १८ | १६ |
| ३१.८ | ३०.७ | २९.७ | २९.७ | ३०.० | २९.० | - | कमाल तापमान (अं.से.) | २८ | २८ | २८ | २८ | २८ |
| २२.७ | २२.५ | २३.४ | २०.५ | २२.२ | २२.४ | - | किमान तापमान (अं.से.) | २३ | २३ | २३ | २३ | २४ |
| ६ | ७ | ७ | ८ | ६ | ७ | - | ढग स्थिती (आकाश) | ८ | ८ | ८ | ८ | ८ |
| ८९ | ८७ | ९० | ९१ | ७९ | ८२ | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९० | ९० | ९० | ९० | ९० |
| ७७ | ६८ | ७० | ८८ | ६८ | ७४ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६४ | ६२ | ६४ | ६४ | ६५ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ९ | ७ | ८ | १० | १० |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | प. | प. | प. | प. | प.नै. |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश/ इशारा** | | प्रादेशिक हवामान संशोधन केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सातारा जिल्ह्यात दिनांक २९ जुलै ते २ ऑगस्ट दरम्यान बऱ्याच ठिकाणी मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. कमाल तापमान २८.० अंश सेल्सिअस दरम्यान तर किमान तापमान २३.० ते २४.० अंश सेल्सिअस दरम्यान राहील. वाऱ्याचा वेग ताशी ०७ ते १० कि.मी. दरम्यान राहील. |
| **सामान्य सल्ला** | | ➢ खरीप पिकामध्ये कोळपणी/ खुरपणी करून घ्यावी.<br>**कोरोना व्हायरस (कोविड-१९) या संसर्गजन्य रोगापासून संरक्षण व संसर्गापासून बचाव करण्यासाठी सल्ला**<br>➢ शेतीसाठी लागणाऱ्या निविष्ठा खरेदी करणेसाठी मार्केट मध्ये जातेवेळी शेतकरी बांधवांनी सामाजिक अंतर पाळावे तसेच तोंडाला मास्क किंवा स्वच्छ रुमाल बांधावा. वेळोवेळी निर्जंतुकीकरण करणारे रसायन किंवा साबण यांनी हात स्वच्छ धुवावेत. |
| **संदेश** | | ➢ सातारा जिल्ह्यामध्ये दिनांक २८ ते ३० जुलै दरम्यान घाट भागात तुरळक ठिकाणी जोरदार स्वरूपाच्या तर दिनांक ३१ जुलै व १ ऑगस्ट रोजी जिल्ह्यामध्ये तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह जोरदार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| **भात** | फुटवे फुटणे | ➢ भात पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार भात खाचरातील पाण्याची पातळी रोप लागणीपासून रोपे स्थिर होईपर्यंत १ ते २ सें.मी. तर रोपांच्या वाढीच्या प्राथमिक अवस्थेत २ ते ३ सें.मी. ठेवावी.<br>➢ करपा रोगाच्या प्रभावी नियंत्रणासाठी प्रादुर्भाव झाल्यापासून टेबुकोनॅझोल २५.९ ई.सी (०.१५%) किंवा हेक्झाकोनॅझोल (०.२०%) या बुरशीनाशकाच्या १५ दिवसांच्या अंतराने तीन फवारण्या घ्याव्यात.<br>➢ खोड कीड, पाने गुंडाळणारी अळी व तपकिरी तुडतुडे यांच्या नियंत्रणासाठी फोरेट १०% (१० किलो) किंवा फिप्रोनील ०.३% (२५ किलो) लागवडीनंतर १ महिन्यांनी प्रती हेक्टर या प्रमाणात जमिनीत मिसळावे. |
| **मका** | शाखीय वाढ | ➢ पिकामध्ये कोळपणी करून घ्यावी.<br>➢ पिकावर अमेरिकन लष्करी आळीचा १०% पेक्षा जास्त प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी खालीलपैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची एकदा फवारणी घ्यावी.<br>क्लोरानट्रानिलीप्रोल १८.५ एस.सी. ०.४ मिली प्रति लिटर पाणी.<br>**किंवा** स्पिनेटोराम ११.७ % एस.सी ०.५ मिली प्रती लिटर पाणी<br>**किंवा** इमामेक्टीन बेन्झोएट ५% एस.जी. ०.४ ग्रॅम प्रती लिटर पाणी<br>➢ जमिनीमध्ये ओलावा कमी प्रमाणात असल्यास आणि पाण्याची गरज असल्यास संरक्षित पाणी द्यावे. |
| **खरीप ज्वारी** | शाखीय वाढ | ➢ पिकामध्ये कोळपणी करून घ्यावी.<br>➢ जिल्ह्याच्या पूर्व भागातील तालुक्यांमध्ये पाण्याची आवश्यकता भासल्यास पिकासाठी संरक्षित पाणी द्यावे. |
| **मूग व उडीद** | शाखीय वाढ | ➢ पेरणीनंतर २० ते २५ दिवस झाले असल्यास पिकामध्ये पहिली कोळपणी करून घ्यावी.<br>➢ जिल्ह्याच्या पूर्व भागातील तालुक्यांमध्ये पाण्याची आवश्यकता भासल्यास पिकासाठी संरक्षित पाणी द्यावे. |

**अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन**

**ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर**

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

| | | |
|---|---|---|
| **भुईमुग** | शाखीय वाढ | ➢ आद्रतायुक्त वातावरणामुळे टिक्का व तांबेरा या रोगाचा प्रादुर्भाव होऊ शकतो प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी २५ ग्रॅम मॅन्कोझेब +२५ ग्रॅम बाविस्टीन प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>➢ पिकावरील रस शोषणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी मिथिल डिमेटॉन २५ ई.सी. १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **सोयाबीन** | शाखीय वाढ | ➢ आद्रतायुक्त वतावरण व वारा यामुळे तांबेरा हा बुरशीजन्य रोग येऊ शकतो यामध्ये पानांवर तपकिरी रंगाचे ठिपके येतात व पाने तपकिरी पडतात, दाण्यांच्या वजनात आणि परिणामी हेक्टरी उत्पादनात घट होते. प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी प्रोपीकानॅझॉल या बुरशीनाशकाची फवारणी १मिली या प्रमाणात १ लीटर पाण्यात मिसळून करावी. |
| **राजमा** | शाखीय वाढ | ➢ पिकामध्ये कोळपणी/खुरपणी करून घ्यावी.<br>➢ पिक २० दिवसाचे झाल्यावर नत्राचा दुसरा हप्ता ३० किलो (७० किलो युरिया) प्रती हेक्टर या प्रमाणात द्यावा. |
| **ऊस** | आडसाली लागवड | ➢ आडसाली उस लागवड १५ ऑगस्ट पर्यंत केल्यास उस उत्पादकता व साखरेचा उतारा चांगला मिळतो. आडसाली उस लागवडीसाठी को. ८६०३२ (नीरा) किंवा को.एम.०२६५ (फुले २६५) या जातींची निवड करावी.<br>➢ एक डोळा रोपांपासून (३० ते ४५ दिवस वयाच्या रोपांची ) ऊस लागवड करावी त्यामुळे नेहमीच्या तुलनेत ऊस लागणीस ३० ते ४५ दिवसांपर्यंत जोपासण्यासाठी लागणारे पाणी, तण नियंत्रण, खते,देखरेख यांची बचत होते. काही वेळेस अगोदरचे पिक काढणीस उशीर होतो अश्या वेळेस रोपे तयार करून वेळेवर उसाची लागवड करता येते.<br>➢ बेण्याद्वारे लागवड करावयाची असल्यास बेणे मळ्यात वाढवलेले ९ ते १० महिने वयाचे निरोगी, रसरशीत आणि अनुवांशिक दृष्ट्या शुद्ध ऊस बेणे वापरावे.<br>➢ बुरशीजन्य रोग व खवले किड याच्यापासून प्रतिबंधासाठी ऊस बेणे लागणीपूर्वी १०० लिटर पाण्यात डायमेथोएट ३० % प्रवाही २६५ मिली मिसळून १० मिनिटांसाठी बुडवून ठेऊन बेणे प्रक्रिया करावी.<br>➢ अॅसेटोबॅक्टर आणि स्फुरद विरघळविणारे जीवाणू संवर्धक अनुक्रमे १० किलो आणि १.२५ किलो प्रती १०० लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात ऊसाच्या टिपऱ्या ३० मिनिट बुडवून नंतर लागण करावी त्यामुळे नत्रखतामध्ये ५० % ची तर स्फुरदखतामध्ये २५ % बचत होते. |
| **आंबा** | वाढीची अवस्था | ➢ बागेत तणनियंत्रण करावे.<br>➢ पूर्ण वाढ झालेल्या झाडास दरवर्षी ५० किलो शेणखत + ७५० ग्रॅम नत्र (१६३० ग्रॅम युरिया) +५०० ग्रॅम स्फुरद (१०८६ ग्रॅम डि.ए.पी.) + ५०० ग्रॅम (८३३ ग्रॅम एम.ओ.पी.)पालाश द्यावे. |
| **कांदा** | रोप | ➢ रांगडा कांदा लागवडीसाठी बियांची गादी वाफ्यावर पेरणी करावी.(संरक्षित पाण्याची सोय असल्यास) |
| **जनावरे** | वाढीची | ➢ पावसाची शक्यता असल्याने जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत.<br>➢ पावसाळ्यात जनावरांना ओला चारा अति प्रमाणात दिल्यामुळे जनावरांचे पोट फुगते त्यामुळे ओला चारा योग्य प्रमाणात द्यावा.<br>➢ पावसाळ्यात मेंढ्यांच्या खुरामध्ये चिखल्या होतात तेव्हा महिन्यातून एकदा कॉपर सल्फेट किंवा फॉरमॅल्डीहाईड द्रावण असलेल्या उथळ हैदातून संपूर्ण खुर बुडतील अश्या सोडाव्यात.<br>➢ शेळ्यांना गोचीड व पिसवा यांपासून त्रास होऊ नये म्हणून डेल्टामेथ्रीन हे रसायन असलेले (उदा. ब्युटॉक्स) द्रावण पशुवैद्यकाच्या सल्ल्याने गोठ्यात व शेळ्यांच्या अंगावर फवारावे. |

स्त्रोत
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : कोल्हापूर
दि. : २८.०७.२०२०

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**
**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**